International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.8 No.3 Jan – Feb 2021

# रयत शिक्षण संस्थेची वाटचाल आणि प्रगती

**डॉ. अभय पाटील**
इतिहास विभाग
स.गा.म.कॉलेज, कराड

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्राच्या समाजजीवनात विशेषतः ग्रामीण भागात असणाऱ्या अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठीसन १९१९ मध्ये मौजे काले या ठिकाणी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्या काळाची गरज ओळखून संस्थेच्या माध्यमातून५७८ व्हॉलंटरी शाळा डोंगरदऱ्यात सुरु केल्या. कर्मवीरांनी सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी एकाच वसतिगृहाची स्थापना करून खऱ्या अर्थाने समताधिष्टीत समाजव्यवस्थेचा पाया घातला. आणि समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला.

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून शैक्षणिक कार्याची प्रेरणा घेऊन ग्रामीण भागात निर्माण केलेले शैक्षणिक कार्याचे जाळे आज एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे समाजाला मार्गदर्शक ठरत आहे. कर्मवीरांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ आर्थिक परिस्थिती नाही म्हणून गोरगरीब समाजातील एकही प्रज्ञावंत विद्यार्थी शिक्षणापासूनवंचित राहणार नाही आणिकोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षण मिळाले म्हणून श्रमाची लाज वाटू नये यासाठी शिक्षणाला श्रमाची जोड दिली. आणि 'कमवा व शिका' ही योजना कार्यान्वित केली. आज कर्मवीरांची

'कमवा व शिका' योजना जागतिक पातळीवर सर्वमान्य झाली आहे. यातून पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचा दूरद्रष्टेपणा दिसून येतो त्यांच्याच वैचारिक बैठकीवर रयत शिक्षण संस्था गेली १०० वर्षे अविरतपणे समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करीत आहे.

महाराष्ट्रातील १५ आणि कर्नाटक राज्यातील १ अशा १६ जिल्ह्यात आज संस्थेचा कार्यविस्तार आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या कालखंडात कर्मवीरांची वैचारिक बैठक अबाधित ठेवून संस्थेने आपल्या शैक्षणिक धोरणात सातत्याने सकारात्मक बदल केले आहेत. संस्थेचे अध्यक्ष आदरणीय खासदार शरदरावजी पवारसाहेब यांच्या दूरदृष्टीतूनविद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी अत्यंत महत्वाचे उपक्रम सुरु केले आहेत. संगणक शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, जैव तंत्रज्ञान, रयत ऑलिम्पियाड, गुरुकुल प्रकल्प, कृषी तंत्रज्ञान[ रयत विज्ञान परिषद यांसारख्या अनेक प्रकारच्या उपक्रमातून उच्च दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे.

शिक्षणाच्या विस्तारीकरणाबरोबरसंस्थेने कार्मावीरांचे शैक्षणिक विचार अबाधित ठेवून गुणवत्तेला सातत्याने प्राधान्य दिलेले आहे. गेली १०० वर्षे महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातील काही जिल्ह्यात शैक्षणिक विस्ताराचे कार्य अविरतपणे संस्था करीत आहे. या शैक्षणिक प्रयोगातील महत्वपूर्ण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे:-

## जीवनपट:

१८८७ जन्म. कुंभोज, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर (दि. २२/०९/१८८७)

१९०२ राजाराम हायस्कूल, कोल्हापूर व जैन बोर्डिंग प्रवेश

१९०९ शिक्षण प्रसारक मंडळ दूधगाव सक्रीय सहभाग

१९१२ कुंभोज येथील श्री.अण्णा पाटील यांची सुकन्याआदक्का(लक्ष्मीबाई) यांच्याशी विवाह.

१९१४ किंग एडवर्ड पुतळा-डांबर प्रकरण- कोल्हापूर

१९१४ ओगले-ग्लास वर्क्स, ओगलेवाडी विक्रेते प्रतिनिधी

१९१६ किर्लोस्करकारखाना,किर्लोस्करवाडी, विक्रेते प्रतिनिधी

१९१७ चिरंजीव आप्पासाहेब यांचा जन्म

१९१९ काले, ता.कराड, येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना (दि.०४/१०/१९१९) व वसतीगृहास्थापनेने शैक्षणिक कार्याची सुरुवात.

१९१९ प्रथम कन्या चि. शकुंतला हिचा जन्म.

१९२० आजन्म खादी वापराचे व्रत

१९२१ किर्लोस्कर ब्रदर्स लि.किर्लोस्करवाडी, येथील सेवेचा राजीनामा

१९२१ नेर्ले. ता.वाळवा येथे वसतिगृहाची स्थापना

१९२२ मे. धनजीशा कूपर यांच्या सहकार्यानेसातारारोडयेथेलोखंड कारखान्याची स्थापना

१९२४ सातारारोड येथील कूपर कारखाना सोडला

१९२४ रयत शिक्षण संस्थेचे सातारा येथे स्थलांतर व सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी मिश्र वसतिगृहाची स्थापना

१९२६ द्वितीय कन्या चि. बेबी हिचा जन्म

१९२७ राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची भेट व श्री. छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसचे नामकरण(दि.२५/०२/१९२७)

१९२८ द्वितीय कन्या बेबी हीचे निधन

१९३० पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांचे अकाली निधन (दि.३०/०३/१९३०)

१९३२ उच्च शिंक्षण घेणाऱ्या विद्यार्थांसाठी पुणे येथे युनियनबोर्डिंग हाऊस या मिश्र वसतिगृहाची स्थापना

१९३५ रयत शिक्षण संस्थेचे रजिस्ट्रेशन

१९३५ राज्यातील पहिल्या ------ खाजगी प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजची सातारा येथे स्थापना (महात्मा फुले अध्यापक विद्यालय सातारा)

१९३६ सातारा येथे रा. ब. काळे -------- स्कूलची स्थापना

१९३८ प्राथमिक शिक्षण समितीची स्थापना व पहिल -------- प्राथमिक शाळा यवतेश्वर (सातारा) व खेडेगावी सुरु केली संस्थेमार्फत ५७८ व्हॉलंटरी प्राथमिक शाळा चालविल्या जात होत्या.

१९४० सातारा येथे पहिल्या मोफत व वसतिगृहयुक्त माध्यमिक शाळेची स्थापना (महाराजा सयाजीराव विद्यालय, सातारा)

१९४१ धुळे मुनिसिपाल्टीतर्फे मानपत्र प्रदान

१९४१ वडील श्री. रायगौडा पाटील यांचे निधन

१९४५ कोल्हापूर व्यापारी वर्गाकडून थैली समर्पण व गौरव

१९४७ सातारा येथे संस्थेच्या पहिल्या मोफत ववसतिगृहयुक्त महाविद्यालायाची स्थापना

१९४८ सातारा जिल्हा विद्यार्थी कॉंग्रेसकडून संत गाडगे महाराज यांच्या हस्ते एक लक्ष रु. निधी अर्पण.संस्थेच्या माझी विद्यार्थ्यांकडून शेवरलेट गाडी प्रदान

१९४९ अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डातर्फे मानपत्र प्रदान

१९५२ किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी येथील कामगारांतर्फे थैली समर्पण व गौरव (केंद्रीय मंत्री ना.डी. पी. करमरकर यांच्या हस्ते)

१९५४ कराड या तालुक्याच्या ठिकाणी सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय हे ग्रामीण भागातील महाविद्यालय सुरु केले.

१९५५ सातारा येथे आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन हे संस्थेतील पहिले शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय सुरु केले.

१९५८ उत्तर (सातारा) जिल्हा लोकल बोर्डातर्फे मानपत्र प्रदान

१९५९ भारत सरकारकडून पद्मभूषण किताब बहालदि.२६.०१.१९५९

१९५९ पुणे विद्यापीठाकडून डी.लिट. पदवी प्रदान दि.०५.०४.१९५९

१९५९ अहमदनगरजिल्ह्यातील जनतेमार्फत रु. १ लक्ष निधी समर्पण दि. ०६.०५.१९५९

१९५९ ससून हॉस्पिटल पुणे येथे निधन ०९.०५.१९५९

१९५९ चार भिंती (गांधी टेकडी) सातारा येथे अग्निसंस्कार दि.१०.०५.१९५९

## सामाजिक कार्ये :

- महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज चळवळीत सक्रीय सहभाग व प्रभावी नेतृत्व.
- अस्पृश्यता निवारण मोहिमेत हयातभर आघाडीचे कार्यकर्ते
- राष्ट्रपिता महात्मा गांधीजीनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघ या संस्थेत सक्रीय असहाभाग
- सामाजिक ऐक्य, न्याय बंधुभाव व ------- यासाठी वाहून घेतलेल्या श्री.गाडगे महाराज मिशन मुंबई या संस्थेत सहभाग
- समाजसुधारक महर्षी विठ्ठल शिंदे यांनी स्थापन केलेल्या '-------- मिशन' चे विश्वस्त
- मुंबई राज्य बॅकवर्ड वेल्फेअर बोर्डाचे सदस्य
- सर दोराबजी टाटा ट्रस्टरुरल वेल्फेअर बोर्डाच्या सहकार्याने देवापूर,ता. माण, जि. सातारा परिसरातील ९ गावांची सर्वांगीण विकास योजना कार्यान्वित
- हरिजनांसाठी स्थापन केलेल्या संत चोखामेळा धर्मशाळा पंढरपुरचे विश्वस्त

- शशिकला सॅनिटोरीयम (टी.बी.हॉस्पिटल) जयसिंगपूर, जि. कोल्हापूर या संस्थेचे विश्वस्त
- पुणे येथील सामाजिक समता व न्याय परिषदेत सक्रीय सहभाग
- साताराडीस्ट्रीक्ट डेव्हलपमेंटबोर्डाचे सदस्य
- रुरल डेव्हलपमेंटबोर्ड सातारा व प्रोविन्शियल बोर्ड मुंबई यांचे सदस्य
- हरिजन सेवेसाठी स्थापना केलेल्या जिल्हा बोर्डाचे सदस्य
- विविध उद्योग धंद्यातील कामगारांच्या हिताची जपणूक त्यासाठी संघटना बांधणी, कामगारांच्या मुलामुलींची शिक्षणाची व्यवस्था यासाठी जाणीवपूर्वक सातत्याने प्रयत्न

## शैक्षणिक कार्य:

१९०९ दुधगाव जि. सांगली येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यात सहभाग होता.

१९१९ काले, ता.कराड, जि. सातारा या ठिकाणी खेड्यातील मुलांच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. पुढे संस्थेचे कार्यालय सातारा येथे हलविले.

१९२१ नेर्ले, ता. वाळवायेथे वसतिगृहाची स्थापना केली व मुष्टीफंडयोजना सुरु केली.

१९२४ सर्व जाती धर्माच्या विध्यार्थ्यांसाठी सातारा येथे एक मिश्र वसतिगृह स्थापन केले व १९२७ साली राष्ट्रपिता म. गांधी यांच्या शुभहस्ते थोर समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज यांचे नाव सदर वसतिगृहास दिले. व वसतिगृहास म. गांधीजीनी (त्यांनी स्थापन केलेल्या) हरिजन सेवक फंडातून वार्षिक ५०० रु. मदत चालू केली.

१९३२ पुणे येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विध्यार्थ्यांसाठी युनियन बोर्डिंग हाउसची स्थापना केली. (सर्व जातिधर्म समावेशक वसतिगृह)

१९३५ रयत शिक्षण संस्था ही कायद्याप्रमाणे रजिस्टर केली व प्राथमिक शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेज

सुरु केले. (महात्मा फुले अध्यापक विद्यालय सातारा)

१९३६ संस्थेचे दुसरे अध्यक्ष मा.रा. ब. काळे यांच्या नावाने सातारा येथे पहिली मराठी शाळा सुरु केली.

१९३८ संस्थेतर्फे पहिली व्हॉलंटरीप्राथमिक शाळा डोंगराळ भागातील यवतेश्वर या खेडेगावी सुरु केली. अशा प्रकारे ५८७ प्राथमिक शाळा डोंगराळ व दुष्काळी खेडेगावात सुरु केल्या.

१९४० सर्व स्तरावरील गोरगरीब विद्यार्थ्यांकरिता महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या नावाने मोफत व वसतिगृह युक्त माध्यमिक शाळा सुरु केली. यापुढे कर्मवीरांनी त्यांच्या हयातीत ग्रामीण भागात १०१ माध्यमिक शाळा सुरुकेल्या.

१९४२ मुलांसाठी मिश्र वसतिगृह सुरु केले व प्राथमिक स्त्री शिक्षिकांसाठी सातारा येथे जिजामाताअध्यापिका विद्यालय या नावाने ट्रेनिंग कॉलेज सुरु केले.

१९४७ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने उच्च शिक्षण देणारे मुंबई राज्याच्या ग्रामीण भागातील पहिले महाविद्यालय, सातारा येथे सुरु केले. ते सुरुवातीस काही वर्षे मोफत व वसतिगृहयुक्त म्हणून चालविले नंतर बाहेरचे विद्यार्थी घेण्यास सुरुवात केली.

१९५४ कराड या तालुक्याच्या ठिकाणी सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय हे ग्रामीण भागातील महाविद्यालय सुरु केले.

१९५५ मौलाना आझाद यांच्या नावे पहिले शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय सातारा येथे सुरु केले.

## अनुषंगिकशैक्षणिक कार्य :

- प्राथमिक शिक्षकांचे सेवाविषयक प्रश्न सोडविण्याच्या कामी प्रत्यक्ष सहभाग व राज्य प्राथमिक शिक्षक संघटनेला बहुमोल मार्गदर्शन
- पुणे विद्यापीठ कोर्टावर शासन नियुक्त सदस्य

- महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगाव जि. नाशिक या संस्थेचे सल्लागार
- लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली या संस्थेचे सदस्य.
- मुंबई राज्याच्या दि. प्रोव्हीन्शियलबोर्ड फॉरएज्युकेशन सदस्य
- रयतशिक्षण संस्थेतील विविध शैक्षणिक प्रयोगाद्वारे स्वावलंबी शिक्षण, श्रम.महात्म्य, कामवा व शिका योजना, स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व समता ही चतु:सूत्री इत्यादींचा देशातील शिक्षणक्षेत्रापुढे आदर्श

## सहकार क्षेत्रातील कार्य :

- कोरेगाव जि. सातारा येथे गरीब शेतकऱ्यांसाठी सहकारी शेती योजना १९१४ मध्ये कार्यान्वित.
- १९४० साली रयत शिक्षण संस्थेतील सेवकांसाठी को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना (आज सोसायटीचे बँकेत रुपांतर होऊन बँकेच्या महाराष्ट्रात मुख्य कार्यालयासह २१ शाखा आहेत.)
- १९४२ साली संस्थेतील शाखांसाठी / सेवकांसाठी को - ऑपरेटिव्ह स्टोअर्स सुरु केले.
- गरीबव होतकरू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य व बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सौ. लक्ष्मीबाई पाटीलफंडाची योजना (तिचे लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिक्षणोत्तेजक पतपेढीत रुपांतर झाले आहे.)
- देवपूर गावात को - ऑप. फार्मिंग सोसायट्या स्थापन करून अल्पभूधारकांचे शेती विकास प्रकल्पाच्या माध्यमातून जीवनमान उंचावले.

## संस्थेस मिळालेले पुरस्कार:

रयत शिक्षण संस्थेने सामाजिक जाणीव ठेवून दलित व दुर्बल घटक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,व भटक्या जमाती इत्यादी वर्गांचा केलेला विकास, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेले अतुलनीय कार्य याची नोंद घेऊन विविध समाजसेवी संस्था, विद्यापीठे, राज्य व केंद्रशासन यांनी संस्थेस खालील पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

१) भारतरत्नडॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार (केंद्रशासन) १९९४

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित-मित्र पुरस्कार (महाराष्ट्रशासन) १९९३- ९४

३) राजर्षी शाहू पुरस्कार (राजर्षी छ. शाहू मेमोरियल ट्रस्ट, कोल्हापूर) १९९९

४) आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार (महाराष्ट्रशासन) २०००-०१

५) श्री गाडगे महाराज सेवा पुरस्कार (श्री संत गाडगे महाराज मिशन, मुंबई) २००१-०२

६) शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती पुरस्कार (यशवंतराव चव्हाणमहाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक) २००३

७) एक्सलंस इन एज्युकेशन पुरस्कार (डॉ.डी.वाय. पाटील प्रतिष्ठान, नवी मुंबई) २०११

८) शाहू, फुले, आंबेडकर पुरस्कार (महाराष्ट्रशासन) २०१२-१३

९) जीवन गौरव पुरस्कार (महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) व साधना ट्रस्ट) २०१३-१४

१०) वटवृक्ष शिव-पुरस्कार (आजी-माजी विद्यार्थी स्नेह मेळावा, कृतिसमिती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) २०१४- १५

११) 'सातारा भूषण पुरस्कार' (रा.न. गोडबोले सार्वजनिक ट्रस्ट, सातारा) २०१५-२०१६

१२) 'भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार' (पुणे महानगरपालिकेतर्फे) २०१६

१३) प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) २०१७
१४) कर्मयोगी पुरस्कार (प्राचार्य डॉ.पी.बी. पाटील, सोशल फोरम ट्रस्ट, सांगली) २०१८
१५) कर्मवीर भाऊराव पाटील क्रांतीदूत पुरस्कार (राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, पुणे) २०१९
सरकार, राज्य सरकार, विविध सामाजिक संस्था यांच्याकडून रयत शिक्षण संस्था करीत असलेल्या कामास मान्यता प्राप्त झाली आहे. या सर्व घटना ती. अण्णांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या आहेत. संस्थेचे हितचिंतक, कार्यकर्ते, पदाधिकारी, शाखाप्रमुख, सेवक व विद्यार्थी या सर्वांच्या अथक प्रयत्नांचे फलित म्हणजे रयत शिक्षण संस्थेची शताब्दीकडेवाटचाल होय.

## संस्था सहकार्य करार (MoU):

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळावे यासाठी संस्थेने आपल्या शैक्षणिक धोरणात सातत्याने सकारात्मक बदल केलेले आहेत. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संगणक शिक्षण, विविधशॉर्टटर्म कोर्सेस, इंग्रजी संभाषण वर्ग यांसारख्या शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून आधुनिक समाजाला आवश्यक असणारे मानव संसाधन निर्माण करण्याचा प्रयत्न संस्था पातळीवर सातत्याने सुरु असतो. तथापि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्ञानाच्या क्षेत्रात होणारे बदल संस्थेच्या ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावेत व या माध्यमातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी म्हणून संस्थेने राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध शैक्षणिक संस्था, विद्यापीठे यांच्याबरोबर सहकार्य करार केले असून या माध्यमातून सुद्धा विद्यार्थ्यांना आधुनिकशिक्षण देण्याचा प्रयत्न संस्था

पातळीवर सातत्याने केला जातो, यापैकी काही महत्वाचे सहकार्य करार खालीलप्रमाणे:

1. RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT) & MAHARASHTRA KNOWLEDGE CORPORATION LIMITED (MKCL)
   MOU DATE - 13-3-2013 (February 2013 to 31 January 2014)
2. RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT) & LEND-A-HAND, INDIA PUNE (IBT) PROJECT
   MOU DATE - 05-12-2014
3. SNS FOUNDATION & RAYAT SHIKSHAN SANSTHA
   MOU DATE - 01-12-2015 (December 2015 to November 2016)
4. RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT) & JAIN IRRIGATION SYSTEM LTD, JALGAON
   MOU DATE - 30-11-2016
5. RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT) & CENTER FOR DEVELOPMENT OF ADVANCED COMPUTING, MUMBAI (C-DAC)
   MOU DATE - May 2016 (for 2 Academic Years from the signed date)
6. RAJIV GANDHI SCIENCE AND TECHNOLOGY COMMISSION (RGSTC) & HOMI BHABHA CENTER FOR SCIENCE EDUCATION (HBCSE) & RAYAT SHIKSHAN SANSTHA (RSS)
   MOU DATE - 24-02-2016 (2Years)
7. RAYAT SHIKSHAN SANSTHA & TATA BUSINESS SUPPORT SERVICES LTD (TBSS)
   MOU DATE - 20-10-2010
8. BVG INDIA LIMITED PUNE & RAYAT SHIKSHAN SANSTHA
   PURPOSE - To provide industry focused quality education and job opportunities to graduate and post graduate student from various colleges of RAYAT SHIKSHAN SANSTHA
   MOU DATE - 22-05-2017
9. RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT) & YASHWANTRAO CHAVAN OPEN UNIVERSITY, NASHIK (YCMOU) & BVG INDIA LIMITED (BVG)
   PURPOSE - To plan and prescribe diploma certificate courses or for any other purpose
   MOU DATE - 04-08-2017
10. RAYAT SHIKSHAN SANSTHA & SYMBIOSIS OPEN EDUCATION SOCIETY
    PURPOSE - In recognition of the proven value of skills based teaching in the mainstream education system
    MOU DATE - 21-08-2017

11. RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT) & COOPER CORPORATION PVT. LIMITED, SATARA (COOPER)
    PURPOSE - To provide industry focused quality education & job opportunities to graduate students from various colleges of RAYAT SHIKSHAN SANSTHA.
    MOU DATE - 04-10-2017
12. MAHARASHTRA STATE SKILL DEVELOPMENT SOCIETY (MSSDS) & RAYAT SHIKSHAN SANSTHA
    PURPOSE - To provide an opportunity to the students for acquiring the skills that are relevant to the market demand, thus making them readily employable.
    MOU DATE - 17-02-2018
13. SCIENCE AND TECHNOLOGY PARK (STP) & RAYAT SHIKSHAN SANSTHA
    PURPOSE - Establishment operations and management of CIII project
    MOU DATE - 22-08-2018
14. SCIENCE AND TECHNOLOGY PARK (STP) & RAYAT SHIKSHAN SANSTHA & TATA TECHNOLOGIES LTD.
    PURPOSE - Establishment operations and management of CIII project
    MOU DATE - 22-08-2018
15. PRATHAM EDUCATION FOUNDATION (PRATHAM) & RAYAT SHIKSHAN SANSTHA
    PURPOSE - To provide and implement educational software, Teacher development plan, Technical updates, Induction session for master trainers.
    MOU DATE - 24-08-2018
16. RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT) & CONNECT BUSINESS SOLUTIONS LIMITED
    MOU DATE - 19-04-2019
17. GODREJ & BOYEE MANUFACTURING COMPANY LIMITED (GODREJ) & RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT)
    MOU DATE - 24-05-2019
18. MAHARASHTRA CENTER FOR ENTERPRENEURSHIP DEVELOPMENT (MCED) & RAYAT SHIKSHAN SANSTHA SATARA (RAYAT)
    PURPOSE - Entrepreneurship Based Training, Education & Research
    MOU DATE - 15-07-2019
19. SAMTA PURUSHOTTAM AGRAWAL MEMORIAL FOUNDATION & RAYAT SHIKSHAN SANSTHA (RAYAT)
    MOU DATE - 30-12-2019